# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 12 August 2024
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक – १२ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०

****

- सर्पदंशामुळे मृत्यूप्रकरणी शेतमजुरांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्यातून लाभ देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश.
- आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा निर्णय झाल्यास आपल्या पक्षाचा पाठिंबा- शरद पवार यांची स्पष्टोक्ती.
- यूजीसी नेट रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.

आणि

- छत्रपती संभाजीनगर इथं चार मोठ्या उद्योजकांकडून ५२ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा निर्णय.

****

सर्पदंशामुळे मृत्यू झालेल्या शेतमजुरांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्यातून लाभ देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. आज राज्य वन्य जीव मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. सर्पदंशावर तत्काळ उपचार मिळावेत यासाठी क्लिनिक ऑन व्हील उपक्रम सुरू करण्याची सूचनाही मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत केली. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्याला वनमजुर म्हणून सामावून घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यनी दिले आहेत.

पेंच इथं पाणमांजर, नाशिक इथं गिधाड आणि गडचिरोली इथं रानम्हैस प्रजनन केंद्र उभारण्याविषयी यावेळी चर्चा झाली. सातारा जिल्ह्यातील जावळीच्या जंगलात ५०० प्रकारच्या दुर्मिळ वनस्पती असून, त्याठिकाणी संशोधन आणि विकास केंद्र सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

वनांमध्ये मेडिकल टुरीजमला प्राधान्य दिल्यास शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल आणि दुर्मिळ वनस्पतींचं जतनही होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या एक पेड माँ के नाम या उपक्रमाची राज्यात जास्तीतजास्त जाणीवजागृती करावी, तसंच राज्यभर ही योजना प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

****

राज्यात जिल्हास्तरीय विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण प्रकल्प तसंच कृष्णा-भीमा खोऱ्यातील विशेषतः कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूर परिस्थिती नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रमाचा आज मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला. या प्रकल्पाला जागतिक बँकेकडून १ हजार ५६२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे.

****

महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन 'मित्र'च्या नियामक मंडळाची मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी आज बैठक झाली. राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलीयन डॉलर होण्याचे उद्दिष्ट साध्य करतानाच 'मित्र' ने कृषी, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, पायाभूत सुविधा, ऊर्जा या क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रीत करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. 'मित्र'ने मुंबईसह, मुंबई महानगर परिसरातील पूरक बाबींवर लक्ष केंद्रीत करावं. त्याचबरोबर हवामान बदल, कृषी क्षेत्रात नवीन प्रयोग, सेंद्रीय शेतीला चालना मिळावी म्हणून मित्र मधील संशोधकांनी यावर भर द्यावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

राज्यात १२३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून हे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे. कृषी क्षेत्राला सौरऊर्जा उपलब्ध करून देण्यासाठी देखील राज्य शासन प्रयत्नशील असून या क्षेत्रातून नऊ हजार २०० मेगावॅट सौरऊर्जा निर्मिती होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

दरम्यान, हिंगोली जिल्ह्यातल्या कावड यात्रेत आज मुख्यमंत्री सहभागी होत आहेत. या यात्रेसाठी मुख्यमंत्री विमानाने नांदेड इथं दाखल झाले. आमदार बालाजी कल्याणकर, माजी खासदार हेमंत पाटील, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, यांच्यासह मान्यवरांनी मुख्यमंत्र्यांचं स्वागत केलं. त्यानंतर मुख्यमंत्री हिंगोलीकडे रवाना झाले.
कळमनुरी इथल्या चिंचाळेश्वर महादेव मंदिरापासून ते हिंगोली शहरातल्या ओम कयाधू अमृतधारा महादेव मंदिरापर्यंत आमदार संतोष बांगर यांच्या नेतृत्वाखाली ही कावड यात्रा आयोजित करण्यात आली आहे.

****

अल्पसंख्याक समाजाच्या विकासाला राज्य सरकारकडून सर्व सहकार्य केलं जात असून विरोधक मात्र दिशाभूल करत असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. आज धुळ्यात जन सन्मान यात्रेच्या निमित्तानं पवार यांनी मुस्लिम बांधवांशी संवाद साधला. राज्य सरकारनं टेक्सटाईल संदर्भात घेतलेल्या हितकारी निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी बैठक आयोजित करण्यात आली असून लवकरच निर्णय घेऊन पुढची पावलं उचलली जातील असं पवार यांनी सांगितलं.

****

येत्या विधानसभा निवडणुकीत सगळ्या २८८ जागा लढवणार असल्याचा पुनरुच्चार मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. ते आज पुण्यात पत्रकारांशी बोलत होते. सगळ्या राखीव जागावर मराठा उमेदवार तर इतर जागेवर अन्य जातीतील उमेदवार निवडून आणणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.आपण स्वतः निवडणूक लढणार की नाही याबाबत येत्या २९ तारखेला निर्णय जाहीर करणार असल्याचं जरांगे यांनी सांगितलं.
दरम्यान, जरांगे यांना प्रकृती बिघडल्यानं पुण्यात सह्याद्री रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं, वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

****

आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा निर्णय झाल्यास आपल्या पक्षाचा याला पाठिंबा असेल असं, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा जास्त वाढवता येणार नाही हा न्यायालयाचा निर्णय आहे. त्यामुळे राज्यातल्या सर्व पक्षांनी

मतभेद विसरून केंद्र सरकारकडे आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी करावी, असं पवार म्हणाले.

****

आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आणि उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. युवाशक्तीवर जगाचं भवितव्य खऱ्या अर्थानं अवलंबून असतं असं सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी युवा दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. जगातील सर्वाधिक तरुण भारतात आहेत, हीच आपल्या देशाची ताकद आहे. तरुणाईच्या मदतीनं आपण २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होऊ असा विश्वास व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी युवा दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी या महिन्याच्या २५ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आपल्या सूचना आणि विचार येत्या २३ तारखेपर्यंत 1800-11-7800 या नि:शुल्क क्रमांकावर, नरेंद्र मोदी ॲप वर किंवा माय जीओव्ही ओपन फोरमवर नोंदवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने आज देशभरातल्या शैक्षणिक संस्थांचं मानांकन जाहीर केलं. यामध्ये भारतीय तंत्रज्ञान संस्था आयआयटी मुंबईने तिसरा क्रमांक पटकावला आहे.

****

यूजीसी नेट परीक्षा रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. येत्या २१ ऑगस्ट रोजी देशभरातले ९ लाख परीक्षार्थी ही परीक्षा देणार असल्याने, ऐनवेळी तारीख बदलता येणार नाही, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेतल्या पीठाने नमूद करत, ही याचिका फेटाळून लावली.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात चार मोठे उद्योजक ५२ हजार कोटी रुपये गुंतवणूक करणार आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं यासंदर्भातल्या बैठकीनंतर ही माहिती दिली. या उद्योजकांचा आज मसिआ या

संघटनेच्या वतीनं सामंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शहरातील उद्योजकांनी यावेळी राज्य सरकारला मानपत्र दिलं. हे मानपत्र म्हणजे विरोधकांनी केलेल्या अपप्रचाराला चोख प्रत्युत्तर असल्याचं सावंत यांनी सत्कार समारंभानंतर पत्रकार परिषदेत बोलतांना सांगितलं.

दरम्यान, जिल्ह्यात बिडकीन औद्योगिक परिसरासाठी जमिनी दिलेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला देण्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेऊ, ही सगळी प्रकरणे येत्या १७ तारखेला मंत्रालयात पाठवावी, असे निर्देश सामंत यांनी दिले. गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे यावेळी उपस्थित होते. उद्योगांमध्ये स्थानिकांना नोकरीत प्राधान्य देण्याची शासनाची भूमिका असून, शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी दिली जाईल तसंच आवश्यक कुशल मनुष्यबळासाठी कंपनीमार्फत कौशल्य प्रशिक्षण देऊन स्थानिकांना नोकरीत सामावून घेतले जाईल, अशी ग्वाही सामंत यांनी दिली.

****

बडतर्फ प्रशिक्षक प्रशासकीय अधिकारी पूजा खेडकर यांना २१ ऑगस्टपर्यंत अटक न करण्याचे आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्ली पोलिसांना दिले आहेत. नागरी सेवा परीक्षा फसवणूक करून उत्तीर्ण झाल्याचा आरोप करत दिल्ली पोलिसांनी खेडकर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्या जामिन अर्जावर न्यायालयानं दिल्ली पोलिस आणि केंद्रीय लोकसवा आयोगाकडून उत्तर मागवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज विभागीय लोकशाही दिनी तीन अर्ज प्राप्त झाले होते त्यापैकी  दोन प्रकरणं निकाली काढण्यात आली. प्राप्त अर्जावर चर्चा करुन संबंधित विभागाने लवकरात लवकर अहवाल सादर करावा. तसेच प्रलंबित अर्जांवर तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी यावेळी दिल्या.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून १५ ऑगस्ट पर्यंत शहरात स्वच्छता महाअभियान राबवलं जात आहे. या महाअभियानात विमानतळ प्राधिकरणाने पुढाकार घेत, परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. जमात-ए-इस्लामी हिंद या संस्थेसह, नवखंडा महिला महाविद्यालय तसंच BSGM शाळेतर्फे आपापल्या परिसरातल्या नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी स्वच्छताफेरी काढण्यात आली.

****

अहमदनगर जिल्ह्यातल्या मुळा धरणाची पाणी पातळी वाढल्यानं आज धरणातून दोन हजार घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये आवश्यकता भासल्यास मुळा धरणातून नदीपात्रामध्ये टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढवण्यात येणार असून, नदीकाठच्या गावांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन पाटबंधारे विभागानं केलं आहे.

****